**जा. क्र. एशेपसं / प्रक्षेत्र/ ३५ / २०२५** **दिनांक :२.५.२०२५**

## निविदा सूचना

प्रति,

______________________________

______________________________

______________________________

**विषय:-** एकात्मिक शेती पद्धती संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावरील सहकारी संस्थेमार्फत ठेके पध्दतीने / कंत्राटी तत्वावर बहायास्त्रोतामार्फात कुशल व अकुशल मनुष्यबळ (पुरुष/स्त्री मजूर) पुरविण्याकरीता दरपत्रक सादर करणेबाबत.....

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने, **सन २०२५-२६** करिता एकात्मिक शेती पद्धती संशोधन, अकोला कार्यालय अंतर्गत **खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामात विविध पिकांचे प्रयोगाचे, रेशीमपालन उत्पादन तसेच गाय / शेळीपालन / कुक्कुटपालन / मत्स्यपालन, इत्यादी** घटक प्रक्षेत्रावर राबविण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने प्रक्षेत्रावरील विविध कामे करण्याकरिता कंत्राटी पध्दतीने पुरुष / स्त्री मजूर लावण्या संबंधीचे दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात खाली स्वाक्षरी केलेल्या पत्त्यावर **दिनांक :** ९.५.२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत पाठविण्या बाबत खुल्याबाजार पेठेतून दर मागविण्याचे प्रस्तावित आहे.

करिता खालील दिलेल्या प्रमाणे दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | विवरण | अकुशल मजूर / चौकीदार | | कुशल मजूर | | शेरा (गरज असल्यास) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रति दिन प्रति मजूर वेतन (रु.) | प्रति महिना प्रति मजूर वेतन (रु.) | प्रति दिन प्रति मजूर वेतन (रु.) | प्रति महिना प्रति मजूर वेतन (रु.) | |
| १ | संस्थात्मक शेती करिता किमान वेतन | १८० | ५,४०० | २४० | ७,२०० | |
| २ | सुधारित विशेष भत्ता | १४१.९६ | ४,२५९ | १४१.९६ | ४,२५९ | |
| **एकूण किमान वेतन(किमान वेतन नियमाप्रमाणे)** | | **३२१.९६** | **९,६५९** | **३८१.९६** | **११,४५९** | |
| ३ | राज्य कामगार विमा (रा. का. वि. म. नियमाप्रमाणे) कामगाराचे योगदान (३.२५%) | १०.४६ | ३१३.९१ | १२.४१ | ३७२.३० | |
| ४ | कामगार भविष्य निर्वाह निधी (का. भ. नि. नि. नियमाप्रमाणे) कामगाराचे योगदान (१३%) | ४१.८५ | १,२५५.६४ | ४९.६५ | १,४८९.६४ | |
| | **एकूण रक्कम (१+२+३+४)** | **३७४.२७** | **११,२२८.५५** | **४४४.०२** | **१३,३२०.९४** | |
| ५ | सेवा शुल्क (रु.) | | | | | |
| | **एकूण रक्कम**(रु.) **(१+२+३+४+५)** | | | | | |

**अटी व शर्ती**

१) निविदा पत्रक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.० ते ५.० या वेळेस स्वीकारल्या जातील.

२) निविदा/ कोटेशन **मुख्य कृषीविद्यावेत्ता, एकात्मिक शेती पद्धती संशोधन, डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला** यांच्या नावाने सीलबंद लिफाफ्यात पाठवावी.

३) कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा वैध परवाना असणे बंधन कारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४) कंत्राटदारास मिळालेल्या कामाच्या देयकाचे १० टक्के रक्कम सुरक्षा सुरक्षा ठेव म्हणून संबंधित विभागाकडे जमा करावी लागेल व काम पूर्ण झाल्यावर सुरक्षा ठेव परत मिळण्याकरिता संबंधित विभागाकडे अर्ज करावा लागेल, त्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.

५) कंत्राटी पध्दतीने पुरुष/स्त्री मजूर लावण्याची व्यवस्था संबंधित निविदा धारकांनी करावी.

६) कंत्राटी पध्दतीने पुरुष/स्त्री मजूर लावण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदा धारकाची राहील.

७) एकात्मिक शेती पद्धती संशोधन कार्यालय व प्रक्षेत्रावरील असलेल्या संपूर्ण कामे करीत असतांना नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशाशानाने लागू केलेल्या नुकसान निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधी निविदा धारकाकडून वसूल करण्यात येईल.

८) कंत्राटी पुरुष/स्त्री मजूर प्रक्षेत्रावर काम करीत असतांना नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदा धारकाची राहील.

९) कंत्राटी पध्दतीने पुरुष/स्त्री मजूर लावतांना शासनाने घालून दिलेल्या शासन निर्णय अटी व नियमांचे तंतोतंत पालन संबंधित निविदा धारकांना करावा लागेल. **प्रति महिना २६ दिवसांसाठी.**

१०) प्रक्षेत्रावर कोणतेही वाद विवाद निर्माण झाल्यास कोट कचेरीत न जाता त्याबाबतचा अंतिम निर्णय विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी / मा. संशोधन संचालक यांच्या समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला यांचा राहील व तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

११) प्रक्षेत्रावर/कार्यालयात देण्यात आलेले काम पूर्ण करण्यात यावे, कामा बाबत प्रक्षेत्रावरून तक्रार आल्यास किंवा काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

१२) कृषी विद्यापीठ प्रशासन वेळोवेळी निदेर्शित केलेल्या नियमाचे पालन करणे निविदा धारकांना बंधनकारक राहील.

१३) प्रक्षेत्रावरील प्रयोग/बिजोत्पादन व अन्य घटक संबंधित कामे हि एक वर्ष मधील खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामाकरिता असून कामाचे दर एका वर्ष करिता वैध राहतील.

१४) कंत्राटी दाराने निविदा सादर करताना संस्थेचे नोंदणी पत्र, भविष्य निर्वाह निधी पत्र, विमा सुरक्षा पत्र, मागील तिन वर्षाचे जी. एस. टी. भरणा केल्याचे पत्र, पेनकार्ड व आयकर विवरण पत्र या दस्तऐवजसह सिलबंद देण्यात यावे.

१५) मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकांनी/ कंत्राट धारकांनी कामा बाबतचा तसेच कंत्राट कर्मचाऱ्यांना किमान वेतन, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी, कॅशलेस पध्दतीचा अवलंब व इत्यादी सर्व सुविधा पुरविणे या बाबतचा स्पष्ट उल्लेख कामे पुरविता वेळी देण्यात येणाऱ्या रु.१००/- किंवा रु.५००/- च्या स्टंप पेपर वर करारनामा मध्ये देण्यात यावा.

१६) मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकांना देयक सादर करते वेळी बँक खाते क्रमांक बाबतची संपूर्ण माहिती देयक सादर करते वेळी देण्यात यावी.

१७) निविदा सूचनांची छायांकित प्रत काढून निविदा दर सादर करण्यात येऊ नये. तसे केल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

**१८) कार्यालयाकडून विलंबाने देयक जमा झाले तरी प्रत्येक वेतन पांच तारखेपर्यंत संबंधित मजुरांना अदा करणे कंत्राट दारास बंधनकारक राहील. किमान वेतन कायद्यानुसार अदा केल्याची माहिती ई. एस. आय. सि. पी. एफ., कामगार कल्याण निधी यांची कामगारांना व त्यांचे योग्य त्या शासकीय खात्याला जमा केल्याची नोंद व चलाणे प्रत्येक महिन्याच्या देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील, देयकासोबत सादर न केल्यास देयक अदा करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.**

१९) निविदा प्रक्रियेतील निविदा मंजूर करण्याचे अधिकार पूर्णतः **मुख्य कृषिविद्यावेत्ता, एकात्मिक शेती पद्धती संशोधन, डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला** कार्यालयाने राखून ठेवलेले आहे व ती अट निविदा धारकास बंधनकारक राहील.

वरील सर्व अटी व शर्ती मान्य असणाऱ्या निविदा धारकांनीच नमूद कामाचे दरपत्रक सादर करावे.

**मुख्य कृषिविद्यावेत्ता**
**एकात्मिक शेती पद्धती संशोधन,**
**डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला.**

**प्रतिलिपी:**

प्रभारी अधिकारी (ARIS Cell), डॉ, पं. दे. कृ. वि., अकोला यांना सादर निविधा विद्यापीठ संकेतस्थळावर उपलोड करण्याकरिता अग्रेषित.